

श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळचे
श्रीमती शां. कां. गांधी कला, अमोलक विज्ञान व प. हि. गांधी वाणिज्य महाविद्यालय कडा
ता. आष्टी जिल्हा बीड ४१४२०२
भूगोल विभाग
प्रा. उध्दव एकनाथ चव्हाण
( विद्यावाचस्तपती )

# सागरशास्त्र

## महासागर तळ रचना

पृथ्वीच्या संपूर्ण पृष्ठभागावर पाणी, बर्फ व जमीन यांचे आवरण आहे. त्यापैकी  सुमारे ७१% भाग खाऱ्या पाण्याच्या प्रचंड जलाशयाने व्यापलेला असून त्याला ‘जागतिक महासागर’ वा ‘महासागर’ म्हणतात. प्रत्येक गोलार्धातील पाणी व जमीन यांच्या प्रमाणाचा विचार केल्यास दक्षिण गोलार्धात पाणी व जमीन यांनी व्यापलेल्या क्षेत्रफळांचे गुणोत्तर जवळ-जवळ ५:१ आहे; तर उत्तर गोलार्धात ते ३:२ आहे. यामुळे अशीही कल्पना करता येते की, पृथ्वी हाच एक प्रचंड महासागर असून खंडे ही त्यामधील बेटे आहेत. महासागर हे पृथ्वीचे  सर्वांत ठळक वैशिष्ट्य असून सोयीसाठी याचे भौगोलिक दृष्ट्या विभाग पाडले जातात. याच्या प्रमुख खंडांशी तुल्य अशा विभागांनाही ‘महासागर’ म्हणतात. (उदा., हिंदी महासागर) आणि या महासागराच्या उपविभागांना ‘समुद्र’ म्हणतात. (उदा. अरबी समुद्र ). महासागराचे स्वरुप, त्याची भौतिकीय व रासायनिक वैशिष्ट्ये, त्यामधील अभिसरण व प्रवाह, जीवसृष्टी, त्यामध्ये घडणारे आविष्कार, त्याची उत्पत्ती इ. सर्व दृष्टींनी करण्यात येणाऱ्या अभ्यासाला व समन्वेषणाला ‘महासागरविज्ञान’  म्हणतात.

- उद्दीष्ट्ये:
- हा धडा पूर्ण केल्यानंतर, आपण सक्षम होऊ:
- महासागराच्या प्राकृतिक सीमा.
- महासागरांची तळ रचना.
- महासागरांतील पर्वत रांगा व पठार.
- महासागरांतील द्रोणी किंवा डोह.
- महासागरांची वैशिष्ट्ये.

**महासागर तळरचना**

## १) अटलांटिक महासागर तळरचना:

१) **विस्तार:** पश्चिमेस उत्तर व दक्षिण अमेरिका,पुर्वेस युरोप व अफ्रिका खंड, उत्तरेस नॉर्वे समुद्र, डेन्मार्कची समुद्रधुनी व डेव्हिस उपसागर.

२) **क्षेत्रफळ:** १०६ दशलक्ष चौ. कि.मी. (१०,६४,६०,००० चौ. कि.मी.) पृथ्वीचा सुमारे २३.५% भाग व्यापला आहे.

३) **पश्चिम-पुर्व अंतर:** ३५° दक्षिण अक्षवृत्तावर पश्चिम-पुर्व अंतर ५९२० कि. मी. विषुववृत्ताजवळ २५६० कि.मी. ४०°अक्षवृत्तावर अंतर ४८०० कि.मी. १००० पेक्षा जास्त खोलीचा प्रदेश २४% आहे.

४) **अटलांटिक महासागर वैशिष्ट्ये:**

१) **समुद्रबुड जमीन (भुखंडमंच):** अमेरिका व अफ्रिका खंडाच्या किनारपट्टीवर सर्वत्र समुद्रबुड जमीन आहे.

२) **अरुंद समुद्रबुड जमीन:** बिस्कीचा उपसागर ते दक्षिणेकडे केप ऑफ गुड होप, ब्राझिलचा पुर्व किनारा ५° ते १०° दक्षिण अक्षवृत्त दरम्यान रुंदी ८०ते १६० कि.मी. अमेरिकेचा ईशान्य किनारा व युरोपचा वायव्य किनारा रुंदी २४०ते ४०० कि.मी. आहे.

३) **ग्रॅंड बॅंक व डॉगर बॅंक:** जगातील सर्वात विस्तीर्ण समुद्रबुड जमीन, क्षेत्रफळ ९५००० चौ.कि.मी.

४) **पॅटगोनिया समुद्रबुड जमीन:** दक्षिणे अटलांटिक महासागर समुद्रबुड जमीन रुंद होत जाते.

५) **महासागर पर्वत रांगा:**

१) अटलांटिक पर्वत रांग उत्तर-दक्षिण दिशेत जलमग्न पर्वत रांग आहे.

२) आकार ईंग्रजी “S” सारखा, लंबी १४४००कि.मी., समुद्र सपाटीपासुन खोली ४००० मी., सागर तळापासुन उंची २०००ते३००० मी.

३) विषुववृत्ताजवळ रोमांशे गर्ते (७३७०मी. खोल) मुळे पर्वताचे दोन भाग, उत्तर भाग “डॉल्फिन पर्वतरांग” तर दक्षिण भाग **“ चॅलेंजर पर्वतरांग”.**

४) आईसलॅंड व स्कॉटलंड दरम्यान **“वायव्हिल थॉमसन पर्वतरांग”** अटलांटिक व आर्किटीक महासागराची सरहद्द निर्माण करते.

५) ग्रीनलॅंड व आईसलॅंडच्या दक्षिणेकडे ५०° अक्षवृताजवळ पर्वतरांग रूंदावते,येथे पाण्याची खोली २००० ते ४००० मी. या भागाला **"टेलिग्राफ पठार"** दक्षिणेकडे रूंद तर पुर्वेकडे तीव्र उतार आहे.

६) टेलिग्राफ पठाराच्या पश्चिमेस **"न्यु-फौंलॅंड पर्वतरांग** आहे. ४०° उत्तर अक्षवृताच्या जवळ "अझोर्स पर्वतरांग" आहे.

७) **"वॉल्व्हिस पर्वतरांग"** ४०° दक्षिण अक्षवृताच्या जवळ, रूंदी ९६० कि.मी. पुढे ४०° दक्षिण अक्षवृत्तानंतर मध्य पर्वतरांग आग्नेयेस वळते तेथुन "केप ऑफ गुड होप" पर्यंतच्या भागाला **"अटलांटिक- अंटार्टिक पर्वतरांग"** म्हणतात.

## ६) महासागरी द्रोणी:

१) लॅब्रॅडोर द्रोणी: उत्तरेस ग्रीनलॅंड व दक्षिणेस न्यु-फौंडलॅंड दरम्यान, सरासरी खोली ४००० मी.

२) स्पॅनिस द्रोणी: ३०° ते ५०° उत्तर अक्षवृत्त दरम्यान त्यास "आथबेरियन द्रोणी" म्हणतात.

३) वायव्य अटलांटिक द्रोणी: सर्वात मोठे द्रोणी, अमेरिकेच्या किनारपट्टीलगत १२° उत्तर ते ४०° उत्तर अक्षवृत्त दरम्यान, खोली ५०००मी.

४) ईशान्य अटलांटिक द्रोणी: अझोर्स पर्वतरांगेमुळे वायव्य अटलांटिक द्रोणी पासुन वेगळे झाले, गोलाकार आकार.

५) केपव्हर्डे द्रोणी: मध्य पर्वतरांग व आफ्रिकेच्या १०° उत्तर ते कर्कवृत्ता दरम्यान, खोली ५००० मी.

६) गिनी द्रोणी: आफ्रिकेच्या गिनी किनारयाजवळ वायव्य-आग्नेय दिसेत पसरले आहे.

७) ब्राझिलिअन द्रोणी: विस्तार दक्षिण अटलांटिक, विषुववृत्तापासुन ३०° दक्षिण अक्षवृत्तापर्यंत आहे.

८) आग्नेय अटलांटिक द्रोणी: आफ्रिकेच्या किनारयालगत ईशान्य-नैर्ऋत्य दिशेत, वॉल्व्हिस पर्वतरांगेपर्यंत विस्तार,खोली ५००० मी.

९) केप द्रोणी: आफ्रिकेच्या पश्चिमेस २५° ते ४५° दक्षिण अक्षवृत्तपर्यत विस्तार.

१०) अर्जेंटिना द्रोणी: अर्जेंटिनाच्या पुर्व किनारयापासुन दक्षिण अटलांटिक पर्वतरांगे पर्यंत, वर्तुळाकार, कमाल खोली ६०० मी.

अगुल्हास द्रोणी: केप ऑफ गुड होपच्या दक्षिणेस विस्तीर्ण द्रोणी, ५०° अक्षवृत्तापर्यंत आहे.

११) अटलांटिक अंटार्क्टिका द्रोणी: पुर्व-पश्चिम दिशेत ६०° दक्षिण अक्षवृत्तापर्यंत पसरले आहे.

**१२) भंग विभाग:**

**१)** अटलांटिक महासागरात कर्कवृत्तावर “केन भंग विभाग”, विषुववृत्तावर “ रोमांशे भंग विभाग” तर मकरवृत्तावर “रिओ ग्रँडी भंग विभाग” आहेत.

**१३) महासागरी डोह:** अटलांटिक महागरात १९ डोह किंवा गर्ता आहेत.

१) वायव्य अटलांटिक द्रोणीच्या उत्तरेस “नॅरेस गर्त” खोली ६०००मी.

२) पोर्टोरिको बेटाच्या पुर्वेस “पोर्टोरिको गर्त” खोली ८४००मी.

३) विषुववृत्ताजवळ “रोमांशे गर्त” खोली ७३७०मी.

४) दक्षिण सँडविच बेटाजवळ “सँडविच गर्त” खोली ९०९० मी. या महत्वाचे गर्त आहेत.

**********

**प्रश्न.**अटलांटिक महासागर तळ रचना स्पष्ट करा?

# अटलांटिक महासागर तळरचना



## २) हिंदी महासागर तळरचना:

हिंदी महासागर जगातील तिसर्याक्रमांकाचा महासागरी विभाग आहे.

१) **विस्तार:** भौगोलिक स्थान उष्ण कटिबंधात, तीन बाजुस आफ्रिका, आशिया व ऑस्ट्रेलिया भुखंडे, दक्षिणेकडे अंटार्क्टिक, अटलांटिक व पॅसिफिक महासागरात विलीन.

२) **खोली:** सरासरी खोली ४०००मी., ६०% प्रदेश खोल सागरी मैदानाने व्यापला असुन सरासरी खोली ४००० ते ६००० मी.

३) **क्षेत्रफळ:** ७० दशलक्ष चौ. कि.मी. (७०,५६०,००० चौ. कि.मी) पृथ्वीचा सुमारे १९.८% भाग व्यापला आहे.

४) **अटलांटिक महासागर वैशिष्ट्ये:**

१) **समुद्रबुड जमीन** (भुखंडमंच): समुद्रबुड जमीन अरबी समुद्र व बंगालच्या उपसागरात, जास्तीत जास्त रूंदी ६४०कि.मी. आहे.

२) आफ्रिक किनारपट्टी पासुन मादागास्कर दरम्यान समुद्रबुड जमीन आहे.

३) हिंदीमहासागराच्या पुर्वेकडील बाजुस समुद्रबुड जमीनीचा विस्तार कमी होत जातो. जावा व सुमात्रा बेटाच्या उत्तरेस व ऑस्ट्रेलियाच्या दक्षिणेस रूंदी २००मी. पर्यंत मर्यादित झालेली आहे.

५) **महासागर पर्वत रांगा:**

हिंदी महासागरात मध्यवर्ती जलमग्न पर्वत रांग उत्तर-दक्षिण दिशेत ४००० मी.खोलीवर जलमग्न पर्वत रांग आहे. मध्यवर्ती जलमग्न पर्वत रांगेमुळे दोन्ही बाजुला सागरी द्रोणी आहेत.

६) **मध्यवर्ती जलमग्न पर्वत रांग उपविभाग:**

१) **लखदिव व चॅगोस पर्वत रांग:** भारतीय उपखंडाच्या दक्षिणेला पर्वतरांग, लक्षद्विप-मालदिव बेटाजवळ रूंदी ३२० कि.मी. पर्वत शिखरे बेटाच्या रूपाने सागर पृष्ठावर दिसतात, सागराची खोली २००० मी. आहे.

२) **चॅगोस सेंटपॉल पर्वतरांग:** विषुववृत्तापासुन ३०° दक्षिण अक्षवृत्तदरम्यान पर्वत रांगेला **“चॅगोस सेंटपॉल पर्वतरांग”** तर २०° दक्षिण अक्षवृत्तानंतर पर्वतरंग आग्नेय दिशेस जाते तीची रूंदी ३२० कि.मी. आहे. या संपुर्ण रांगेला “मध्य हिंदी पर्वत रांग” म्हणतात.

३) **अँमस्टरडॅम-सेंटपॉल पठार**: “मध्य हिंदी पर्वत रांगेची रूदी १६०० कि.मी. होते, याभागाला **“अँमस्टरडॅम-सेंटपॉल पठार”** म्हणतात.

४) **केरग्युलेन-गॉसबर्ग पर्वतरांग:** ऑस्ट्रेलियन-अंटार्क्टिक द्रोणी व एंडरबी अगाध मैदान दरम्यान वायव्य-आग्नेय दिशेत १००० मी. खोलीवर **“केरग्युलेन-गॉसबर्ग पर्वतरांग”** आहे.

५) **हिंदी-अंटार्क्टिक उठाव:** ऍगुल्हास पठाराच्या दक्षिणेला निमवर्तुळाकार **“हिंदी-अंटार्क्टिक उठाव”** आहे. मध्य पर्वत रांगेच्या अनेक उपशाखा आफ्रिका व भारतीय उपखंडाच्या किनारयापर्यंत जातात.

६) **सोकोट्रा-चागोस पर्वत रांग:** ज्याला चागोस-लॅकादिव पठार म्हणून देखील ओळखले जाते, एक महत्वाचा ज्वालामुखीय कडा आणि उत्तर आणि मध्य हिंद महासागर यांच्या दरम्यान पसरलेला महासागरीय पठार आहे.

७) **सेचिलिस पर्वत रांग:** १८° दक्षिण अक्षवृत्ताजवळ सोकोट्रा-चागोस पर्वत रांगेला १२८० कि.मी. अंतरावर समांतर रांग आहे.

८) **मादागास्कर पर्वतरांग:** मादागास्कर बेटाच्या दक्षिणेस समुद्रबुड जमीनीच्या नंतर मादागास्कर पर्वतरांग आहे.

९) **प्रिंस एडवर्ड-क्रोझेट पर्वतरांग:** ४८° दक्षिण अक्षवृताच्या दक्षिणेस ४५° ते ५५° पुर्व रेखावृता दरम्यान च्या भागाला “प्रिंस एडवर्ड-क्रोझेट पर्वतरांग” म्हणतात.

१०) **९०° पुर्व रेखांस पर्वतरांग:** मध्य हिंदी पर्वतरांगेला समांतर, पुर्वेला दक्षिणोत्तर दिशेत पसरलेली आहे.


११) **कार्लस्बर्ग पर्वतरांग:** मध्य हिंदी पर्वतरांगेच्या उत्तरेला वायव्य-आग्नेय दिशेत अरबी समुद्राचे ही रांग दोन भाग करते, सागराची खोली २२०० ते ३०००मी. आहे.

१२) **भंग विभाग:** मेलव्हिल भंग विभाग, डायमेंटिना भंग विभाग व ऑस्ट्रेलियन-अंटार्क्टिक विसंवाद आहे.

**७) द्रोणी (Basin):** हिंदी महसागरात द्रोणींची सरासरी खोली ४००० ते ८००० मी. आहे.

**१) ओमन द्रोणी:** ओमनच्या आखाता जवळ, सरासरी खोली ४००० मी.

## हिंदी महासागर तळरचना



२) **अरेबियन द्रोणी:** आफ्रिका किनारपट्टी व भारतीय उपखंडाच्या दरम्यान वर्तुळाकार, खोली ४००० ते ६००० मी. तर दक्षिणेस रूंदी वाढत जाते.

३) **सोमाली द्रोणी:** पश्चिमेंस आफ्रिका किनारपट्टी, पुर्वोतरेस सोक्रोटा चॅगोस व सेंटपॉल पर्वतरांग, दक्षिणेस सेचिलिस पर्वतरांग दरम्यान ही द्रोणी आहे.

४) **मादागास्कर द्रोणी:** मादागास्कर व सेंटपॉल पर्वताच्या दरम्यान १०° ते ५०° दक्षिण अक्षवृत्ता दरम्यान उत्तर-दक्षिण दिशेत, सरासरी खोली ४००० ते ६००० मी. आहे.

५) **नाताळ द्रोणी:** मादागास्कर पर्वतरांगेच्या पश्चिमेस विस्तारआहे.

६) **हिंदी-अंटार्क्टिक द्रोणी:** प्रिन्स एडवर्ड-क्रोझेट पर्वतरांगेच्या दक्षिणेस अंटार्क्टिका खंडापर्यंत विस्तार, सरासरी खोली ६००० मी. पेक्षा जास्त आहे.

७) **अंदमान द्रोणी:** अंदमान बेटाच्या पुर्वेस बंगालच्या उपसागरात उथळ द्रोणी आहे.

८) **इंडो-ऑस्ट्रेलियन द्रोणी:** मध्यवर्ती पर्वतरांगेच्या पुर्वेस, विस्तार १०° उत्तर ते ५०° दक्षिण अक्षवृत्त, सरासरी खोली ४००० ते ८००० मी.आहे.

९) **पुर्व इंडियन-आस्ट्रेलियन द्रोणी:** मध्यवर्ती पर्वतरांगाच्या शाखांनी वेढले आहे, विस्तार ५०° दक्षिण अक्षवृत्ताच्या व पश्चिमेंस केरग्युलेन पर्वतरांगाच्या दरम्यान आहे.

८) **महासागरी डोह:** हिंदी महागराच्या एकुण सागरी क्षेत्रफळापैकी ६०% सागरी क्षेत्र सरासरी ४०००ते ६००० मी. खोल सागरी मैदान आहे. सागरी द्रोणींची संख्या मर्यादित आहे. जावा बेटाच्या दक्षिणेस सर्वात खोल **“सुंदा गर्त”** असुन खोली ८११० मी.. आहे.

******

**प्रश्न.** हिंदी महासागर तळ रचना स्पष्ट करा?

## 3) प्रशांत महासागर तळ रचना

**अ) प्रशांत महासागराने** पृथ्वीचा १/३ भाग व्यापला आहे.

१) **विस्तार:** पश्चिमेस आशिया खंडापासुन पुर्वेस दोन्ही अमेरिकेच्या किनारयापर्यंत आहे.पश्चिम-पुर्व लांबी १६००० कि.मी.व रूंदी उत्तरेस बेरिंगच्या समुद्रधुनीपासुन दक्षिणेस अंटार्क्टिका खंडाच्या केप ऍंडेर पर्यंत उत्तर-दक्षिण रूंदी १४८८० कि.मी.

२) **आकार:** त्रिकोणाकृती आहे. प्रशांत महासागराच्या १७६००० कि.मी. लांबीच्या किनारपट्टीवर घडीपर्वताच्या समांतर रांगा आहेत.पश्चिमेस आशिया किनारयावर ज्वालामुखी निर्मीत पर्वत रांगा तर पुर्वेस उत्तर अमेरिकेत रॉकी पर्वत व दक्षिण अमेरिकेत अँडीज पर्वत किनारपट्टीस समांतर आहे.

**आ) प्रशांत महासागराची वैशिष्टये:**

१) **समुद्रबुड जमीन:** ऑस्ट्रेलियाचा पुर्व किनारा, इंडोनेशियाची बेटे व आशियाच्या पुर्व किनारयालगत रूंद समुद्रबुड जमीन आहे. समुद्रबुड जमीनीचा विस्तार १६० ते १६०० कि. मी.आहे तर उत्तर व दक्षिण अमेरिकच्या पश्चिम किनारपट्टीलगत समुद्रबुड जमीनीचा विस्तार ८० कि. मी. आहे.

**इ) पर्वतरांगा:** प्रशांत महासागराच्या मध्यभागात पर्वत रांगा आढळत नाहीत, तर मुख्यत्वेकरून पर्वतरांगा पुर्वभागात आढळतात.

१) **अल्बेट्रॉस पठार/ पुर्व प्रशांत पर्वतरांग:** मध्य अमेरिकेच्या किनार्यापासुन नैऋत्येस १६०० कि.मी. लांबी, तर खोली ४४०० मी., नंतर २३° दक्षिण ते ३५° दक्षिण अक्षवृत्त दरम्यान पर्वतरांगेच्या दोन शाखा होतात.

२) **पुर्व आयलंड पर्वतरांग:** ही शाखा दक्षिणेस, सरासरी खोली २००० ते ४००० मी. आहे.

३) **न्यझिलंड पर्वतरांग:** २०° दक्षिण अक्षवृत्ताजवळ न्युकॅलोडिनियाच्या पश्चिमेस ही पर्वतरांग आहे. खोली २०० ते२००० मी. फिजी बेटाच्या उत्तरेस रांग रूंद होत जाते, यावरच २००० मी. उंचीचे **फिजी पठार** आहे.

४) **क्विन्सलँड पठार:** हे पठार ऑस्ट्रेलियाच्या ग्रेटबॅरिअर रिफच्या पुर्वेस आहे.

५) **हवाईन उंचवटा:** मध्य प्रशांत महासागरात सर्वात महत्वाची पर्वतरांग आसुन लांबी ३००० कि.मी. व रूंदी ९६० कि. मी. १७° दक्षिण ते २५° दक्षिण अक्षवृत्त दरम्यान वायव्य-आग्नेय दिसेत पसरलेली आहे..

ई) **भंग विभाग: मरे, मोलोकाई, क्लॅरिऑन, क्लिपरटॉन** व दक्षिण प्रशांत महासागरात **एल्टॅनीन** आसे भंग विभाग आहेत.

उ) **महासागरी द्रोणा:**

१) **फिलिपाईन्स द्रोणी:** फिलिपाईन्स बेटाच्या पुर्वे पासुन ते जपानच्या दक्षिणेस ५०° उत्तर अक्षवृत्तापर्यंत व खोली ५००० ते ६००० मी. आहे.

२) **फिजी द्रोणी:** फिजी बेटाच्या दक्षिणेस विस्तार २२° दक्षिण ते ३२° दक्षिण अक्षवृत्ताच्या दरम्यान व खोली ४००० मी. पेक्षा जास्त आहे.

३) **पुर्व ऑस्ट्रेलियन द्रोणी:** ऑस्ट्रेलियाच्या पुर्वेस, वर्तुळाकार, सरासरी खोली ४००० मी. तर उत्तरेकडे ५००० मी. पर्यंत खोली आढळते.

४) **दक्षिण ऑस्ट्रेलियन द्रोणी/ जेफरीज द्रोणी:** ऑस्ट्रेलियाच्या दक्षिणेस ५००० मी. खोल, उत्तर-दक्षिण दिशेत पसरले आहे.

५) **पेरू-चिली द्रोणी/ आग्नेय प्रशांत द्रोणी:** पेरू किनारयाच्या पश्चिमेस ४००० मी. खोलीचे विस्तीर्ण रूंद द्रोणी आहे.

ऊ) **महसागरी डोह/ गर्त:** प्रशांत महासागरात एकुण ३२ डोह आहेत.

१) **ऍल्युशियन गर्त:** ऍल्युशियन बेटा लगत, कमानाकार, खोली ६००० मी. आहे.

२) **टस्कारोरा/ कुरील - कामचटका डोह:** कुरील - कामचटका डोह किंवा गर्त, ही वायव्य प्रशांत महासागरातील एक सागरी गर्त आहे. हे कामचटकाच्या आग्नेय किनारयालगत आहे आणि होक्काइडोच्या पूर्वेस जपान गर्तेस ते कुरिल बेट साखळीस समांतर आहे.

३) **जपान गर्त:** जपान गर्त हा ईशान्य जपानच्या पॅसिफिक रिंग ऑफ फायरचा एक सागरी गर्त आहे. हे कुरिल बेटांपासून इझु बेटांच्या उत्तरेकडील टोकापर्यंत पसरले आहे आणि त्याची खोल ८०४६ मीटर (२६३९८ फूट) आहे.

४) **फिलिपाईन्स गर्त:** फिलिपाईन्स बेटाच्या पुर्वेस ६४ कि. मी. लांबीचा गर्त आहे,

५) **एमडेन डोह:** मिंडानाओ बेटाजवळ, १०५०० मी. खोली आहे.


६) **मरिआना गर्त/ नेरो डोह:** मरिआना बेटाजवळ, खोली ११०२२ मी. जगातील सर्वात खोल गर्त आहे.

७) **टोंगा गर्ता:** टोंगा आणि केरमॅडेक बेटाच्या ईशान्य-नैऋत्य दिशेत विस्तार, खोली ८००० मीटर आहे.


८) **पेरू-चिली गर्त:** पेरू-चिली गर्त, याला अटाकामा गर्त म्हणून देखील ओळखले जाते, हे पूर्वी प्रशांत महासागरातील एक सागरी गर्त आहे, जे पेरू आणि चिलीच्या किनारयापासून सुमारे १६० किलोमीटर (९९ मैल) अंतरावर आहे. समुद्रसपाटीपासून जास्तीत जास्त ८०६५ मीटर (२६४६० फूट) खोलीपर्यंत पोहोचते आणि अंदाजे ५९०० किमी (३६६६ मैल) लांब आहे.

---

**आकृती: महसागरी डोह/ गर्त (Trench)**


Accretionary prism
Volcanic arc
Ocean trench
Oceanic crust
Continental crust
Moho discontinuity
Solid uppermost mantle
Lithosphere
Magma chamber
Rising diapirs
Asthenosphere
Subduction zone

## प्रशांत महासागर तळ रचना




**प्रश्न.** प्रशांत महासागर तळ रचना स्पष्ट करा?